आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१९ ऑक्टोबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या मोर्चेबांधणीला वेग

- महायुतीच्या घटकपक्षांची काल नवी दिल्लीत विस्तृत चर्चा, तर महाविकासआघाडीची आज मुंबईत बैठक
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज 'राष्ट्रीय शिक्षण कर्मयोगी सप्ताहाचं' नवी दिल्ली इथं उद्घाटन

- राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी विजया रहाटकर यांची नियुक्ती

**आणि**

- बंगलोर क्रिकेट कसोटी सामन्यात भारताच्या दुसऱ्या डावात फलंदाजांना सूर गवसला/ सर्फराझ खानचं पहिलं शतकं

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडी च्या मोर्चेबांधणीला वेग आला आहे. महायुतीचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची भाजपाचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत काल बैठक झाली. या बैठकीत विधानसभा निवडणुकीतल्या जागावाटपाबाबत सविस्तर चर्चा झाली असून अनेक जागांवरला तिढा सोडवण्यात यश आल्याचं सांगण्यात येत आहे. राज्यातल्या २८८ जागांपैकी भाजपाला दीडशे, शिवसेना ८७ ते ९० आणि राष्ट्रवादी काँग्रेस ५० जागांवर लढण्यासाठी इच्छुक आहे. दरम्यान, इच्छुक उमेदवारांची संख्या जास्त असल्याने

अनेक ठिकाणी बंडखोरीची शक्यता आहे. त्या अनुषंगानेही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

महाविकास आघाडीमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. उद्धव ठाकरे यांच्या तब्बेतीची विचारपूस करण्यासाठी आपण त्यांच्या निवासस्थानी आलो होतो, असं काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी आज पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

महाविकास आघाडीची जागावाटपासंदर्भात बैठक होणार असून त्यात काँग्रेसकडून नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून जयंत पाटील आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून संजय राऊत सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसनं सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जाहीरनामा समिती स्थापन केली आहे. समितीचे निमंत्रक म्हणून पक्षाचे सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे यांची निवड करण्यात आली असून या समितीत राज्यातले विद्यमान मंत्री आणि पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी ज्या पात्र मतदारांनी अद्याप नावनोंदणी केलेली नाही त्यांना आजचा दिवस, संधी आहे. आज रात्री १२ वाजेपर्यंत मतदार नोंदणीचे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगानं जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, नामनिर्देशन पत्र सादर करण्याची मुदत २९ ऑक्टोबरपर्यंत आहे. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या १० दिवसांपूर्वी मतदार नोंदणी करता येते. मतदार नोंदणीचे अर्ज संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, विधानसभा निवडणूक कार्यालयात उपलब्ध आहेत. त्या

कार्यालयात अर्ज भरून जमा करावयाचे आहेत. तसेच ऑनलाईन मतदार नोंदणी करण्यासाठी https://voters.eci.gov.in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी आणि अधिक माहितीसाठी टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक १९५० वर संपर्क साधावा. व्होटर हेल्पलाईन ॲपद्वारे मतदारांना आपले नाव तपासता येईल आणि नवीन मतदार नोंदणीही करता येईल, असे जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातून सांगण्यात आले.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या ७ मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज 'राष्ट्रीय शिक्षण कर्मयोगी सप्ताहाचं' नवी दिल्ली इथं उद्घाटन झालं. राष्ट्रीय शिक्षण सप्ताहात प्रत्येक कर्मयोगी किमान चार तास आपल्या क्षमतेशी निगडित काही नवीन शिकण्याचा कार्यक्रम पूर्ण करेल. राष्ट्रीय शिक्षण सप्ताहात वैयक्तिक नागरिक, विविध मंत्रालयातल्या विभागातले कर्मचारी आणि इतर संघटनांमध्ये काम करणारे कर्मचारी सहभागी होतील. डिजिटल परिसंस्थेच्या मदतीनं नागरिकांच्या हितासाठी प्रशासकीय यंत्रणा तयार व्हावी आणि कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळावं, या उद्देशानं सप्टेंबर २०२० मध्ये कर्मयोगी अभियान सुरू करण्यात आलं. नागरी सेवा देणाऱ्यांसाठी क्षमता निर्मिती आणि मानव संसाधन व्यवस्थापनासाठी विकास साधण्याचा हा कार्यक्रम आहे.

<><><><><>

राष्ट्रीय स्तरावरील रबी कृषी संमेलनाचं उद्घाटन केंद्रिय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं होणार आहे. केंद्रिय कृषीराज्यमंत्री रामनाथ ठाकूर हे देखील यावेळी उपस्थित राहतील. कृषी उत्पादन वाढवण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आधारित पद्धतींमध्ये सहकार्य आणि नाविन्याला चालना देणं, हा या परिषदेचा उद्देश आहे. तसंच आगामी रब्बी हंगामासाठी कोणते उपक्रम राबवले जाऊ शकतात आणि त्यासाठीच्या धोरणांवर चर्चा करण्यासाठी विविध मंत्रालयं, राज्यं, केंद्रशासित प्रदेश आणि संघटनांचे प्रतिनिधी एकत्र येतील.

<><><><><>

केंद्र सरकारनं राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी विजया रहाटकर यांची नियुक्ती केली आहे. यासंदर्भात अधिसूचना केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयानं काल जारी केला. या आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झालेल्या त्या पहिल्याच मराठी व्यक्ती आहेत. यापूर्वी त्यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष म्हणूनही काम केलेलं आहे. सध्या त्या भाजपाच्या राष्ट्रीय सचिव आहेत.

<><><><><>

बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत ९ जणांना अटक केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी बाबा सिद्दीकी यांच्या सुरक्षारक्षकाला निलंबित केलं आहे. सुरक्षेसाठी तैनात असतांनाही त्यानं कर्तव्यात कसूर केल्याबद्दल कॉन्टेबल शाम सोनवणे याला निलंबित करण्यात आलं आहे. हल्लेखोरांनी मिरची पावडरच्या स्प्रेचा आणि धुराचा वापर केल्यामुळे गोळीबार करता न आल्याचं त्यानं आपल्या जबानीत म्हटलं आहे. या हत्याप्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी बाबा सिद्दीकी यांचा मुलगा आमदार जीशान सिद्दीकी यांनी केली आहे.

<><><><><>

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या पाच पिकांच्या वाणाचा समावेश भारताच्या राजपत्रात करण्यात आला आहे. याबाबत केंद्रीय कृषी आणि

शेतकरी कल्याण मंत्रालयानं अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. यात परभणी चणा-१६, सोयाबीनच्या एमएयूएस ७३१, देशी कापसाच्या पीए ८३३, अमेरिकन कापसाच्या एनएच ६७७ आणि तिळाच्या टीएलटी १० या वाणांचा समावेश आहे. हे वाण विकसित करण्यासाठी महत्त्वाचं योगदान देणाऱ्या वैज्ञानिकांचं अभिनंदन कुलगुरूंनी केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे नाशिक इथं मॅरेथॉन स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिकं देण्यात आली.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान बेंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदानावर सुरु असलेल्या पहिल्या क्रिकेट कसोटीत अखेर भारतीय फलंदाजांना सूर गवसला. काल तिसऱ्या दिवशी रोहित शर्मा, विराट कोहली आणि सर्फराझ खान यांनी अर्धशतकं झळकावली आणि दिवसअखेर ३ बाद २३१ धावांचा पल्ला गाठला. आज सकाळी खेळ सुरु झाल्यावर सर्फराज खाननं  आंतरराष्ट्रीय कसोटीतलं पहिलं शतक झळकावलं तर ऋषभ पंत यानं ५५ चेंडूत ५० धावा फटकावल्या. भारताची धावसंख्या ३ बाद ३४४ असताना पाऊस पडू लागला आणि उपाहारासाठी  खेळ थांबवण्यात आला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ४ बाद ४१९  धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

मलेशिया इथं होणाऱ्या सुल्तान जोहोर चषक स्पर्धेत भारतीय ज्युनिअर पुरुष हॉकी संघाचा पहिला सामना आज जपानशी होणार आहे. भारतीय वेळेनुसार दुपारी १ वाजून ३५ मिनिटांपासून हा सामना सुरू होत आहे.

भारताची लढत २० ऑक्टोबरला ग्रेट ब्रिटनशी, २२ ऑक्टोबरला मलेशियाशी आणि २३ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. सांघिक लढतींतील भारताचा अखेरचा सामना २५ ऑक्टोबरला न्यूझिलंडविरुद्ध होणार आहे.

**<><><><><>**

**रत्नागिरी** जिल्ह्याला परतीच्या पावसानं झोडपून काढलं असून जिल्ह्यात या महिन्यात सरासरी दीडशे मिलिमीटर पाऊस झाला आहे. एक जूनपासून आतापर्यंत जिल्ह्याच्या वार्षिक सरासरीच्या १२९ टक्के पाऊस झालेला आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या पावसामुळे भातपिकाचं नुकसान झालं असून, कृषी विभागाकडून पंचनामे सुरू आहेत. पावसामुळे आतापर्यंत केवळ ३५ टक्के क्षेत्रावरचीच कापणी होऊ शकली. देवरूख, राजापूरसह काही ठिकाणी वीज पडल्यामुळे पाच कामगार जखमी झाले आहेत. चिपळूणमधल्या परशुराम घाटात दोन दिवसांपूर्वी संरक्षक भिंत कोसळल्यानं मातीचा भराव वाहून गेला आहे.

**पालघर** जिल्ह्यात गेले १०-१२ दिवस विजांच्या कडकडाटांसह सुरु असलेल्या जोरदार पावसामुळे भात आणि नाचणी पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.

**जळगांव** शहरासह जिल्हयात परतीच्या जोरदार पावसानं संध्याकाळपासून हजेरी लावली आहे. विजांच्या कडकडाटांसह झालेल्या या वादळी पावसामुळे कापूस, मका आणि कडधान्याच्या पिकांचं नुकसान झालं आहे. अग्नावती आणि गडद नदीला सोमवारी आलेल्या पुरात तीन जणांचा बुडून मृत्यू झाला होता. नगरदेवळा इथं वीज पडल्यामुळे एका वृद्धाचा तर दुसऱ्या घटनेत बैल आणि २ वासरांचा मृत्यू झाला आहे.

**//<><><><><>//**